
# अनामप्रेम स्नेहवार्ता



## अनामप्रेम - मासिक वृत्तपत्रिका

## March - 2026

Scanned with OKEN Scanner



**अनामप्रेम संस्थेच्या हिंमतभवन वस्तीगृह, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प व पुणे वसतिगृह येथे होळीचा सण उत्साहात साजरा झाला. पारंपरिक पद्धतीने पूजन व होळी प्रज्वलन करत “वाईटाचा नाश, चांगल्याचा विजय” हा संदेश देत सर्वांनी आनंदाने सण साजरा केला.**

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा झाला. मान्यवरांच्या प्रेरणादायी उपस्थितीत महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश देत विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणे केली. मार्गदर्शन, सन्मान आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवत कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.





**संस्थेच्या ‘सत्यमेव जयते ग्राम’ प्रकल्पाला विद्यार्थी सहाय्यक समितीच्या विद्यार्थ्यांनी दिली सदिच्छा भेट.. ही भेट केवळ औपचारिक न राहता राबविण्यात येणारे सामाजिक जाणीव आणि सेवाभाव जागवणारा एक प्रेरणादायी अनुभव ठरली.**
**या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी दिव्यांग मुलांसाठी चालणारे विशेष शिक्षण, कौशल्य विकास आणि स्वावलंबनासाठीचे विविध उपक्रम जवळून पाहिले. त्यामुळे समाजासाठी कार्य करणाऱ्या संस्थांचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले.**






## भक्तिसंध्येत अनामप्रेमचा यशस्वी सुरेल प्रवास

अहिल्यानगर येथील आनंदधाममध्ये पू. श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती दिनानिमित्त जैन सोशल फेडरेशन यांच्या वतीने आयोजित भक्तिसंध्या कार्यक्रमात समूह गीत गायन स्पर्धा उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

या स्पर्धेत अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल आवाज, तालबद्ध सादरीकरण आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांची मने जिंकली. मोठा गट व छोटा गट अशा दोन विभागांत झालेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेचा गौरव वाढवला.



अहिल्यानगर येथे महसूल विभागाच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात अनामप्रेम संस्थेच्या अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, आधार कार्ड अपडेट तसेच आयुष्मान भारत कार्ड काढण्याची प्रक्रिया सुलभरीत्या पूर्ण करण्यात आली. तसेच काही विद्यार्थ्यांना संजय गांधी निराधार पेन्शन योजनेचा लाभही मंजूर झाला, ज्यामुळे त्यांना आर्थिक आधार मिळाला.

या शिबिरामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना शासकीय सेवांचा थेट लाभ मिळून त्यांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता सुलभ झाली आहे.



Scanned with OKEN Scanner

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट तंत्रज्ञानाची नवी दिशा




अहिल्यानगर येथील अनामप्रेम संस्थेत 21 मार्च 2026 रोजी कम्युनिटी आय केअर फाउंडेशन (गोगटे'ज आय क्लिनिक, पुणे) व Vision Aid USA यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांना अत्याधुनिक स्मार्ट साधनांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत तज्ज्ञांकडून नेत्रतपासणी करून 38 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी 25 पूर्णतः अंध विद्यार्थ्यांना स्मार्ट व्हिजन ग्लासेस व स्मार्टफोन, तर 13 अंशतः अंध विद्यार्थ्यांना लो व्हिजन डिव्हाइसेस प्रदान करण्यात आल्या.

या आधुनिक साधनांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण, वाचन व दैनंदिन कौशल्ये अधिक सुलभ होणार असून त्यांच्या आत्मविश्वासात मोठी वाढ होणार आहे.

## प्रेरणादायी कार्याचा गौरव – आदर्श महिला सत्कार समारंभ



कॉसमॉस फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना दिला जाणारा आदर्श महिला सत्कार समारंभ पुण्यात पार पडला.

यात अनामप्रेम संस्थेतील कु. कल्पना कदम हिचा क्रीडा क्षेत्रातील यशासाठी, तसेच माजी विद्यार्थिनी श्रावणी गडाख हिचा शासकीय सेवेतल्या उल्लेखनीय कार्यासाठी गौरव करण्यात आला.



Scanned with OKEN Scanner

# पाहुण्यांच्या संस्था भेटी

www.anamprem.org



सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक, येथे मा. श्री. धीरेंद्र शर्मा (द सिंदिया स्कूल, ग्वाल्हेर येथील प्राध्यापक) यांनी सदिच्छा भेट दिली.
या भेटीदरम्यान त्यांनी संपूर्ण प्रकल्पाची सखोल पाहणी करून दिव्यांग मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. संस्थेच्या शिक्षण, प्रशिक्षण व रोजगाराभिमुख कार्याची त्यांनी मनापासून दखल घेत प्रशंसा व्यक्त केली.




स्व. आमदार अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त अन्नदान उपक्रम

स्व. आमदार श्री. अरुणकाका जगताप यांच्या जन्मदिनानिमित्त शिववरद प्रतिष्ठानचे किशोर डागवाले सर यांच्यातर्फे अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग मुलांसाठी अन्नदानाचा उपक्रम आयोजित करण्यात आला.



24 मार्च 2026 रोजी न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील T.Y.B.A. इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी अनामप्रेम संस्थेस भेट दिली. दिव्यांग मुलांसाठी चालणाऱ्या उपक्रमांची माहिती घेत विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी लेखनिक म्हणून सेवा देण्याची तयारी दर्शविली. तसेच, संस्थेस लागणाऱ्या मदतीसाठी आम्ही नेहमी तयार आहोत, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.



ह्यूस्टन, अमेरिका येथील श्री रवी भामीदिपती सर यांची अनामप्रेम संस्थेस सदिच्छा भेट त्यांची ही भेट संस्थेसाठी प्रेरणादायी ठरली. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि स्वावलंबनासाठी सुरू असलेल्या उपक्रमांविषयी त्यांनी जाणून घेतले आणि संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.



Scanned with OKEN Scanner

# सामाजिक बांधिलकीतील नवे उपक्रम






**अनामप्रेम परिवार व Y4J नोकरी प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माजी विद्यार्थी मेळावा व प्रमाणपत्र वितरण समारंभ सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प येथे यशस्वीरीत्या संपन्न झाला.**





**अनामप्रेम संस्थेच्या 'सत्यमेव जयते ग्राम' प्रकल्पात गुढीपाडवा उत्साहात साजरा**

**अहिल्यानगर येथे अनामप्रेम संस्थेच्या 'सत्यमेव जयते ग्राम' प्रकल्पात गुढीपाडवा सण आनंद, उत्साह आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. गुढी पूजनासह दिव्यांग विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी सांस्कृतिक उपक्रमांद्वारे मराठी नववर्षाचे स्वागत केले.**



Scanned with OKEN Scanner







**विपश्यना संशोधन संस्थेच्या 'मित्र' उपक्रमांतर्गत श्रवण व वाक्-दोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विपश्यना साधनेचा विशेष कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. सांकेतिक भाषेत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना ध्यानाचा अनुभव देण्यात आला, ज्यात सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.**




**एक कदम संस्थेच्या वतीने गौरांग शाळेतील विद्यार्थ्यांना हेडफोनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा आहे.**



**अनामप्रेम संस्थेत बजाज फायनान्सच्या HR हेड यांची सदिच्छा भेट संपन्न झाली. संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती घेत त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण व पुनर्वसनासाठी होत असलेल्या कार्याचे कौतुक केले.**



Scanned with OKEN Scanner

स्थापना 2005
अनामप्रेम
दिव्यांग हितार्थ, नित्य समर्पण

# “दिव्यांग विद्यार्थ्यांच्या श्रमातून उमललेली समृद्धीची बाग”





अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम व यशवंत प्रकल्पातील माळरान आज दिव्यांग विद्यार्थ्यांच्या परिश्रमाने हिरवेगार झाले आहे. फळझाडांची लागवड व सेंद्रिय शेतीद्वारे ते स्वावलंबन, आत्मविश्वास आणि श्रमसंस्कारांचे सुंदर उदाहरण घडवत आहेत.







Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम - मार्च - 26 वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या




हिंमतभवन वसतिगृह

लाभार्थी 52



गौरांग वसतिगृह

लाभार्थी 14



सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प

लाभार्थी 87



यशवंत प्रकल्प आधारग्राम

लाभार्थी 6




अनामप्रेम पुणे वसतिगृह

लाभार्थी 9



मराठवाडा वसतिगृह

लाभार्थी 12



## अनामप्रेम संचलित प्रकल्पातील एकूण लाभार्थी संख्या 180

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.



अनामप्रेम संस्थेस ज्येष्ठ नागरिक संस्थेचे सदस्य मा. श्री. जनार्दन बाजीराव पाटील यांच्याकडून मदत प्राप्त..
मराठवाडा प्रकल्पाशी एकामागोमाग एक व्यक्ती जोडली जात असून सेवाभावाची ही साखळी अधिक बळकट होत आहे.

## अमरावती येथे राज्यस्तरीय अंध बुद्धिबळ स्पर्धेत अनामप्रेमचा सहभाग

अमरावती येथे आयोजित राज्यस्तरीय अंध बुद्धिबळ स्पर्धेत अनामप्रेम संस्थेच्या संभाजीनगर प्रकल्पातील खेळाडूंनी उत्साहात सहभाग नोंदवला आहे. श्री. देवानंद लांडगे, अण्णा सायर व प्रवीण चंदनसे यांनी पहिल्याच दिवशी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.









अनामप्रेम छत्रपती संभाजीनगर प्रकल्पासाठी आयोजित कार्यक्रमात डॉ. गिरीष कुलकर्णी व श्री. भारतजी यांच्या भेटीचा आनंद लाभला. तसेच अनेक जुने व नवे मान्यवरांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने प्रकल्पाला नवचैतन्य मिळाल्याचा अनुभव आला. विशेषतः डॉ. अलका मांडके यांच्याशी झालेली भेट उल्लेखनीय ठरली.



Scanned with OKEN Scanner

## “पाय अपुरे... पण पंख अमर्याद!”

## एका अदम्य जिद्दीची सुवर्णगाथा – अजिनाथ दांडगे



**जन्मतःच अंधत्व लाभलेलं आयुष्य... पण मनात प्रकाशाचा अथांग सागर!**
**ही कथा आहे एका अशा जिद्दी मनाची, ज्याने अंधारालाही उजेडाची भाषा शिकवली — अजिनाथ दांडगे.**

**१३ एप्रिल १९९७ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील मंगळूर या छोट्याशा खेड्यात अजिनाथचा जन्म झाला. नियतीने त्याच्या डोळ्यांवर अंधाराची छाया टाकली होती, पण त्याच्या मनात मात्र आत्मविश्वासाचा दीप अखंड पेटत होता. आई अनिता आणि वडील सखाराम — साधे शेतकरी. घरात वैभव नव्हतं, पण मायेची ऊब आणि कष्टाची शिदोरी मात्र भरपूर होती.**

**लहानपणापासूनच अजिनाथच्या मनात एकच स्वप्न होतं —**
**“स्वतःच्या पायावर उभं राहायचं!”**

**संघर्षातून उमललेलं स्वप्नफूल.....**
**पालोद येथील यशवंत विद्यालयात त्याने पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेतलं.**
**दररोजचा शाळेचा रस्ता त्याच्यासाठी फक्त अंतर नव्हतं, तर तो एक संघर्ष होता.**
**जिथे इतर विद्यार्थी सहज धावत पोहोचत, तिथे तो हळूहळू चालत, कधी पडत, पण पुन्हा उभा राहत पुढे जात असे. प्रत्येक पाऊल त्याच्यासाठी ध्येयाच्या दिशेने टाकलेली एक ठाम शपथ होती.**

**पुढील शिक्षणासाठी त्याने नगर जिल्ह्यातील पेमराज सारडा महाविद्यालयात बी.ए.साठी प्रवेश घेतला. आर्थिक अडचणी, शारीरिक मर्यादा — सगळ्यांशी सामना करत तो पुढे चालत राहिला.**
**त्याच्या मनात एकच आवाज घुमत होता —**
**“एक दिवस मी माझ्या आई-वडिलांचा अभिमान बनेन!”**

**अनामप्रेम – आयुष्याला दिशा देणारा दीपस्तंभ.....**
**२०१७ हे वर्ष त्याच्या आयुष्यात नवा सूर्य उगवणारे ठरले. त्याची ओळख अनामप्रेम संस्थेशी झाली — आणि त्याच्या आयुष्याला एक नवी दिशा मिळाली.**



Scanned with OKEN Scanner

अनामप्रेम हे केवळ एक संस्था नाही, तर ते आत्मविश्वासाचं विद्यापीठ आहे. इथे "दिव्यांग" हा शब्द नाही, इथे प्रत्येकजण "दिव्य" आहे!
इथे त्याने केवळ शिक्षण घेतलं नाही, तर स्वतःची ओळख शोधली.
त्याच्या मनात सुप्त असलेल्या क्षमतांना इथे पंख मिळाले

अनामप्रेम हे केवळ एक संस्था नाही, तर ते आत्मविश्वासाचं विद्यापीठ आहे. इथे "दिव्यांग" हा शब्द नाही, इथे प्रत्येकजण "दिव्य" आहे!
इथे त्याने केवळ शिक्षण घेतलं नाही, तर स्वतःची ओळख शोधली.
त्याच्या मनात सुप्त असलेल्या क्षमतांना इथे पंख मिळाले.

यानंतर त्याने Youth for Jobs या प्रशिक्षण केंद्रात एक महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि आपल्या मेहनतीच्या जोरावर त्याला प्रकल्पात काम करण्याची संधी मिळाली.

स्टोअर विभागापासून ते शेती विभागापर्यंत – जिथे जबाबदारी मिळाली, तिथे त्याने स्वतःला पूर्णपणे झोकून दिलं. त्याचा प्रामाणिकपणा, सातत्य आणि कामावरील प्रेम यामुळे तो सर्वांच्या मनात घर करून गेला.

कष्ट, जिद्द आणि स्वप्नांची सांगड.....
काम करत असतानाच त्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची इच्छा व्यक्त केली.
संस्थेच्या संचालकांनी त्याच्यावर विश्वास ठेवत त्याला हिम्मतभवन प्रकल्प, गांधी मैदान, अहिल्यानगर येथे राहण्याची सोय करून दिली.
दिवसा काम... आणि रात्री अभ्यास...थकवा असायचा, पण चेहऱ्यावरचं हसू कधीच कमी झालं नाही.
कारण त्याला माहित होतं –
"देव परीक्षा घेतो, पण हार मानणाऱ्यांची नाही... जिद्दींची घेतो!"

यशाचा सुवर्णक्षण.....
"रात्र कितीही काळोखी असली, तरी मनातला दिवा विझू देऊ नये..."

अखेर त्याच्या अथक प्रयत्नांना फळ मिळालं.
२०२२ साली अजिनाथ दांडगे यांची श्रम व रोजगार मंत्रालय, संभाजीनगर येथे सरकारी सेवेसाठी निवड झाली.

त्या क्षणी आईच्या डोळ्यांत अश्रू होते – पण ते दु:खाचे नव्हते... ते अभिमानाचे होते!
ती भावूक होऊन म्हणाली –
"माझ्या मुलाला दिसत नाही... पण तो आता जगाला दिशा दाखवतो आहे!"



Scanned with OKEN Scanner

**अनामप्रेम – आयुष्याची खरी ओळख.....**
अजिनाथ आजही अनामप्रेम संस्थेशी जोडलेला आहे.
तो मनापासून सांगतो —
“जिथे जग अपंगत्वावर हसतं, तिथे अनामप्रेम क्षमतेवर विश्वास ठेवतं!”
“इथे आल्यानंतर मला कळलं — मी अंध नाही... माझ्यात अपार क्षमता आहे!”
अनामप्रेमने त्याला फक्त नोकरी दिली नाही, तर स्वत:वर विश्वास ठेवण्याची ताकद दिली.

**शेतीतूनही उभा राहिलेला आत्मविश्वासाचा हिरवा प्रवास.....**
नोकरी आणि शिक्षणासोबतच अजिनाथने आपल्या मातीतल्या नात्यालाही कधी तुटू दिलं नाही. गावाकडील शेतीकडे लक्ष देत त्याने सुमारे दीड हजार फळझाडांची लागवड करून एक नवा आदर्श निर्माण केला. सिताफळ, आंबा, पेरू आणि जांभूळ यांसारख्या फळझाडांनी आज त्याची शेती बहरली आहे. या झाडांच्या संगोपनातून त्याने केवळ उत्पादनच मिळवलं नाही, तर कष्ट आणि संयम यांचं सुंदर फळही चाखलं, अंधत्व असूनही मातीशी नातं जपून ठेवलं.

**प्रेरणेचा अखंड दीप.....**
अजिनाथ दांडगे ही केवळ एक व्यक्ती नाही तर तो एक विचार आहे... एक प्रेरणा आहे... एक जिवंत उदाहरण आहे! नुकतेच अजिनाथ याचे लग्न झाले असून, त्याला आता त्याच्या आयुष्याचा नवा जोडीदार देखील मिळाला आहे.

तो सांगतो —
डोळे सक्षम नसले तरी चालतील, पण मनात उडण्याचे पंख असले पाहिजेत!”

परिस्थिती कधीच अडथळा ठरत नाही... जर तुमच्याकडे जिद्द, परिश्रम आणि योग्य मार्गदर्शन असेल — तर कोणतेही स्वप्न अशक्य नसते!

ही कथा आपल्याला एकच शिकवण देते —
अंधार कितीही गडद असला, तरी, एका जिद्दी मनाचा प्रकाश त्याला हरवू शकतो!



अजिनाथ दांडगे...
नाव एक, पण प्रेरणा असंख्य!



Scanned with OKEN Scanner

संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.

**संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805**



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| Bank Name | State Bank Of India |
|---|---|
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.



Scanned with OKEN Scanner